Savitribai Phule Shikshan Prasarak Mandal's

# N B NAVALE SINHGAD COLLEGE OF ENGINEERING

(*Approved by AICTE & Affiliated to PAH Solapur University, Solapur*)

Opp. PAH Solapur University, Solapur – Pune National Highway, Kegaon, Solapur. 413255, (MH), India.

**Prof. M. N. Navale**
M. E. (Elect.), MIE, MBA
CHAIRMAN

**Dr. Rohit Navale**
M. E. Ph. D.(Mech. Engg.)
GENERAL SECRETARY

**Dr. S. D. Nawale**
M. Tech., Ph. D. (E&TC Engg.)
PRINCIPAL

Date: - 11/08/2025

## Circular

**Subject**: Admission Through Carry-On.

**Reference**: Circular from University-PAHSUS/BoS/2025/6287 Date- 07/08/2025

All the students of this college are hereby informed that with reference to above circular from PAH Solapur University, Solapur the students who failed in their University examination in A.Y. 2024–25 and could not become eligible to keep their term for A.Y. 2025–26 are provided one opportunity to take the admission through carry-on for the Academic Year 2025–26, on or before 16/08/2025.

All such students (those who wish to) can avail the benefit of this opportunity provided they will require to pay the college fees in full (i.e. Tuition fee plus Development fee) as applicable for their respective batch.

In this case, these fees can be paid in two installments as follows:

1. First installment of 50% of total fees at the time of admission.
2. Second installment of 50% of total fees on or before 10/11/2025.

If any student could become eligible to apply for scholarship in due course, then their extra paid fees will be refunded after receiving the scholarship amount to the Institute.

Also, as per our earlier notices for provisional admissions circulated dated 25/06/2025, 10/07/2025, 15/07/2025 and 22/07/2025, if any student have not taken their provisional admission till date (including the students taking admission through Carry-On), are required to pay the applicable late fees too.

Therefore, all the students taking their admission through Carry-on should understand circulars properly and should sign the undertaking before applying for admission.

N. B. Navale Sinhgad College of Engineering Solapur 413 255.

11/08/2025

Dr. S. D. Navale
Principal

Attachment: 1. Above referred University Circular
2. Format of Undertaking

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
PUNYASHLOK AHILYADEVI HOLKAR SOLAPUR UNIVERSITY, SOLAPUR
केगांव, सोलापूर-४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)
✆ ०२१७-२७४४७७८/ ११३/११४ (११ लाईन्स), फॅक्स: ०२१७-२३५१३००
संकेतस्थळ : http:sus.ac.in ✉ registrar@sus.ac.in
bos@sus.ac.in
NAAC Accredited 2022 'B++' Grade (CGPA 2.96)

## अभ्यासमंडळे विभाग

## परिपत्रक

**विषय: कॅरीऑन बाबत.**

संदर्भ: १. दि.२८/०७/२०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.५१.
२. दि.२८/०७/२०२५ रोजी झालेल्या विद्यापरिषदेच्या बैठकीतील ठराव क्र.५८(६).
३. कॅरी ऑन गठीत समितीची दि.३१/०७/२०२५ व दि.०४/०८/२०२५ रोजीची बैठक

विद्यापीठ अधिकार मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता चारही विद्याशाखा अंतर्गत येणाऱ्या अभ्यासक्रमामध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असलेल्या सर्व विद्यार्थ्यांना तसेच एल. एल. एल. बी. आणि बी. ए. एल. एल. बी. अभ्यासक्रमास शैक्षणिक वर्ष २०२५-२६ या वर्षाकरिता फूल कॅरीऑन देण्याच्या प्रस्तावाच्या अनुषंगाने खालीलप्रमाणे मान्यता देण्यात येत आहे.

**अ.** शैक्षणिक वर्ष २०२५-२६ करीता एल.एल.बी. आणि बी.ए. एल.एल.बी या अभ्यासक्रमाकरिता Carry On खालील नियमांच्या अधिन राहून लागू करण्यात येत आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता जे विद्यार्थी एल.एल.बी. आणि बी.ए. एल.एल.बी च्या या अभ्यासक्रमाकरिता प्रवेशित आहेत, अशाच विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ करीता Carry On चा लाभ देण्यात येईल.
२. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ करीता जे विद्यार्थी एल.एल.बी. आणि बी.ए. एल.एल.बी च्या या अभ्यासक्रमाकरिता प्रवेशित होते. परंतु संबंधित अभ्यासक्रमाच्या परीक्षेतील विषयांमध्ये अनुत्तीर्ण झाल्यामुळे ते शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये पुढील वर्गात प्रवेश घेण्यास पात्र नव्हते, अशा विद्यार्थ्यांना Carry On चा लाभ देऊन पुढील वर्गातील प्रवेशाकरिता पात्र समजण्यात यावे.
३. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये Carry On चा लाभ केवळ त्याच विद्यार्थ्यांना देय राहील, ज्यांना त्यांचे प्रवेशित अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली यांनी विहित केलेल्या तरतूदींनुसार अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विहित केलेला कालावधी व संधी उपलब्ध आहे.
४. सदर नियमावली विद्यापीठ संकुले तसेच सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था / महाविद्यालयांना कळविण्यात यावी.
५. Carry On ची विशेष संधी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये उपलब्ध करून देण्यात यावी.
६. Carry On अंतर्गत देण्यात आलेल्या संधी संबंधी आवश्यक त्या बाबींची पूर्तता संबंधीत संकुल / महाविद्यालयाने यांनी करावी.
७. पुढे अशीही शिफारस करण्यात येते की, उपरोक्त प्रस्तावित नियमावली व्यतिरिक्त प्रवेश व परीक्षेसंबंधीचे विद्यापीठाने विहित केलेले Statute, Ordinance व इतर सर्व नियम लागू राहतील. त्याचप्रमाणे पदवीसंबंधी शिखर संस्थेने वेळोवेळी अमलात आणलेले नियमही लागू राहतील.
८. सदर Carry On संधी उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेल्या विविध लाभाबाबत केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, शासकीय व निमशासकीय कार्यालय व तसेच पदवीसंबंधी शिखर संस्थेने वेळोवेळी अमलात आणलेले नियमही लागू राहतील. याबाबत संबंधितांना कळविण्यात यावे.

**ब.** शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असलेल्या सर्व विद्याशखेतील विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ वर्षाकरिता एल.एल.बी. आणि बी.ए. एल.एल.बी अभ्यासक्रम वगळता सर्व विद्याशाखा अंतर्गत विविध अभ्यासक्रमाकरिता प्रवेश घेण्यासाठी खालील नियमांच्या अधिन राहून Carry On लागू करण्याची शिफारस समिती करीत आहे.

१. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असलेल्या सर्व विद्याशाखा अतंर्गत विविध अभ्यासक्रमाकरिता प्रवेशित सर्व पात्र विद्यार्थ्यांना शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असल्यामुळे त्यांना शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ वर्षाकरिता प्रवेश घेण्यास पात्र ठरत नव्हते, अशा सर्व प्रवेशित विद्यार्थ्यांना Carry On चा लाभ देण्याची शिफारस समिती करीत आहे.

२. शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असलेले सर्व विद्याशाखा अतंर्गत विविध अभ्यासक्रमाकरिता प्रवेशित विद्यार्थी जे शैक्षणिक वर्ष २०२४-२०२५ मध्ये अनुत्तीर्ण झालेल्या आणि निकाल प्रलंबित असल्यामुळे शैक्षणिक वर्ष २०२५-२६ वर्षाकरिता प्रवेश घेण्यास पात्र ठरत नव्हते, अशा विद्यार्थ्यांना Carry On चा लाभ देऊन पुढील वर्गातील प्रवेशाकरिता पात्र समजण्यात यावे.

३. शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये Carry On चा लाभ केवळ त्याच विद्यार्थ्यांना देय राहील, ज्यांना त्यांचे प्रवेशित अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विद्यापीठ अनुदान आयोग, नवी दिल्ली, इतर संबंधित शिखर संस्था व शासनाने यासंबंधी वेळोवेळी विहित केलेल्या तरतूदींनुसार अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी विहित केलेला कालावधी व संधी उपलब्ध आहे.

४. सदर नियमावली विद्यापीठ संकुले तसेच सर्व संलग्नित महाविद्यालये व मान्यता प्राप्त संस्था / महाविद्यालयांना कळविण्यात यावी.

५. Carry On ची विशेष संधी शैक्षणिक वर्ष २०२५-२०२६ मध्ये उपलब्ध करून देण्यात यावी.

६. Carry On अंतर्गत देण्यात आलेल्या संधी संबंधी आवश्यक त्या बाबींची पूर्तता संबंधीत संकुल / महाविद्यालयाने यांनी करावी.

७. पुढे अशीही शिफारस करण्यात येते की, उपरोक्त प्रस्तावित नियमावली व्यतिरिक्त प्रवेश व परीक्षेसंबंधीचे विद्यापीठाने विहित केलेले Statute, Ordinance व इतर सर्व नियम लागू राहतील. त्याचप्रमाणे पदवीसंबंधी शिखर संस्थेने वेळोवेळी अमलात आणलेले नियमही लागू राहतील.

८. सदर Carry On संधी उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे प्रवेशित विद्यार्थ्यांना अनुज्ञेय असलेल्या विविध लाभाबाबत केंद्र सरकार, महाराष्ट्र शासन, शासकीय व निमशासकीय कार्यालय व तसेच पदवीसंबंधी शिखर संस्थेने वेळोवेळी अंमलात आणलेले नियमही लागू राहतील. याबाबत संबंधितांना कळविण्यात यावे.

(डॉ. अर्चना साळुंखे)
उपकुलसचिव

सोबत: हमीपत्राचा नमूना जोडलेले आहे. त्याप्रमाणे पुढील कार्यवाही करावी.

पुअहोसोविसो/अमंवि/२०२५/ 6287
दि. 07 AUG 2025

प्रत: माहितीस्तव तथा पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी:
१. **मा.कुलगुरु महोदयांचे कार्यालय,** पुअहोसोविसो.
२. **मा. प्र-कुलगुरु महोदयांचे कार्यालय,** पुअहोसोविसो
३. **मा. कुलसचिव महोदयांचे कार्यालय,** पुअहोसोविसो
४. **मा. संचालक,** परीक्षा व मूल्यमापन मंडळ विभाग, पुअहोसोविसो
५. **मा. प्राचार्य,** विद्यापीठ संलग्नित सर्व विधी महाविद्यालये, पुअहोसोविसो.
६. **Edulab,** पुअहोसोविसो.

# -:हमीपत्र:-

विद्यार्थ्याचे नाव: ______________________________________________

महाविद्यालयाचे नाव: **एन. बी. नवले सिंहगड अभियांत्रिकी महाविद्यालय, केगाव, सोलापूर -४१३२५५**

वर्ग: ______________________ कॅटेगरी: ______________________

वर्ष: ______________________

मी (पूर्ण नाव) ______________________________ स्वेच्छेने लिहून देतो/देते की,

मी पुढील वर्गात प्रवेश घेण्यासाठी पात्र नसतानाही विद्यापीठाने माझे मागील वर्गातील नापास विषयांसह पुढील वर्षी प्रवेश मिळण्याकरिता Carry On लागू केले आहे. प्रस्तुत Carry On द्वारे माझा ______________ वर्गातील प्रवेश हा शै. वर्ष 2025-26 साठी असेल. माझा प्रवेश विद्यापीठ अनुदान आयोग , शिखर संस्था व विद्यापीठ नियमाच्या विसंगत झाले असेल तर माझा प्रवेश कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येऊ शकतो याची मला जाणीव आहे व तसे झाल्यास माझी काही हरकत नसेल. तसेच शासनाने महाविद्यालयास ठरवून दिलेली पूर्ण फी (Tuition Fee + Development Fee) मी भरेन आणि शासनाकडून मिळणाऱ्या शिष्यवृत्ती व अन्य लाभापासून मी वंचित राहिलो/राहिले तर माझी कोणतीही हरकत राहणार नाही. तसेच मी प्रवेशित असलेले अभ्यासक्रम UGC ने विहित केलेल्या कालावधीत पूर्ण करणे माझ्यावर बंधनकारक आहे. या बाबत मला संपूर्ण कल्पना आहे.

हे हमीपत्र मी स्वेच्छेने लिहून देत आहे. दि. ______________

स्वाक्षरी:

विद्यार्थ्याचे नाव:

मोबाईल नंबर:

वर्ग:

विभाग प्रमुख:

स्थळ:

दिनांक: